# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/१०/२०२५ (मंगळवार )**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद खापा आणि पारशिवणी पोलसांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक २०/१०/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्य प्रदेश मधुन रूग्णवाहीकेमध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे खापा पोलीसांनी तात्काळ फॉरेस्ट नाका, खापा येथे नाकाबंदी केली असता संशयीत रूग्णवाहीका येताना दिसली पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला परंतु वाहन चालकाने वाहन न थांबविता पारशिवणीच्या दिशेने पळ काढला. खापा पोलीसांनी तात्काळ सदर माहीती पारशिवणी पोलीसांना दिली. पारशिवणी पोलीसांनी तात्काळ शिवाजी चौक, पारशिवणी येथे नाकाबंदी केली असता रूग्णवाहीका क्रमांक यु.पी २३ टी ४५२४ ही येताना दिसली . पोलीसांना पाहुन सदर वाहन चालक वाहन सोडुन पळुन गेला. पोलसांनी शिताफिने वाहन चालकासह असलेल्या आरोपी नामे इमरान सहा गुलजार सहा, वय ३० वर्ष रा. यादवनगर ऑटो मोटीव्ह चौक,जि.नागपुर याला पकडले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष एक रूग्णवाहीका क्रमांक यु.पी २३ टी ४५२४ किंमती ५,००,०००/— रूपये आणि गोवंश जनावरे किंमती १,०५,००० /— रूपये असा एकुण किंमती ६,०५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द २८१,३२५ भा.न्या.सं महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. मिळुन आलेल्या आरोपी नामे इमरान सहा गुलजार सहा, वय ३० वर्ष, रा. यादवनगर ऑटो मोटीव्ह चौक,जि.नागपुर याला अटक केली आहे.

## अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, केळवद पोलीसांची कामगिरी

दिनांक २०/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत केळवद पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणारे आरोपीतांबाबत गुप्त बातमीदारकडुन माहीती प्राप्त झाली. सदर माहीती प्राप्त होताच केळवद पोलीसांनी तात्काळ मौजा तिष्टी खुर्द शेत शिवार येथे जावुन कारवाई केली.**एका महीला आरोपीवर** कारवाई करत १२० लिटर मोहाफुल दारू किंमती १२,००० /— रूपये आणि ८०० लिटर मोहाफुल सडवा किंमती २८,०००/— रूपये आणि इतर साहित्य असा एकुण ४८,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपी **नामे** आरोपी १) नामे अविनाश संजय पवार, २) आशुतोष संजय पवार, दोन्ही रा. तिडंगी (पारधी बेडा) यांचे वर कारवाई करत त्याचे ताब्यातुन १०० लिटर मोहाफुल दारू किंमती १०,००० /— रूपये आणि **८००** लिटर मोहाफुल सडवा किंमती २८०००/— रूपये आणि इतर साहित्य असा एकुण ४९,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही **कारवाई मध्ये एकुण ९८,००० /—** रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

## अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, रामटेक पोलीसांची कामगिरी

दिनांक २०/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत रामटेक पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारू काढणारे आरोपीतांबाबत गुप्त बातमीदारकडुन माहीती प्राप्त झाली. सदर माहीती प्राप्त होताच रामटेक पोलीसांनी तात्काळ मौजा कांद्री माईन येथे जावुन कारवाई केली. आरोपी नामे १) लालु यादव रा कांद्री माईन ०२) आशिष तुरणकर, दोन्ही रा कंद्री माईन अशा आरोपीतांवर कारवाई करून ५०० लिटर मोहाफुल सडवा किंमती १७,५०० /— रूपये आणि **इतर साहीत्य असा एकुण** किंमती २०,०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १ गुन्हा नोंदविण्यात आले आहे.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २१/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांनी लष्करशाह दर्गा येथील उर्स कार्यक्रमामध्ये हजर असलेल्या कमगारांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

१. **लॉटरी न काढता लॉटरी लागल्याचा मॅसेज आल्यास सावधान व्हा. लॉटरी चे पैसे मिळण्याऐवजी तुमची आर्थिक फसवणुक होण्यची शक्यता असते.आलेल्या मॅसेजची पडताळणी करा.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930, 1945 यावर तक्रार नोंदवा.**




## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६३२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २१/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६३२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे २९ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २३ आरोपी अशा एकुण १०७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३९आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने